**<u>प्रेसनोट</u>** दि. 10/11/2025

**ॲन्टी करप्शन ब्युरो,पुणेकडून देलवडी, ता.दौंड येथील तलाठी यांचेविरोधात लाचमागणी व स्विकारलेप्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे घटक** |
|---|---|
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | यवत पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलमान्वये. |
| **तक्रारदार** | पुरुष, वय 50 वर्ष |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | दीपक नवनाथ आजबे वय 39 वर्ष, तलाठी सजा - देलवडी, रा.ठी. फ्लॅट नंबर 18, आनंद हेरिटेज, केडगाव स्टेशन, ता.दौंड जि.पुणे, मूळ पत्ता- मु.पो.खापर पांघरी ता. जि. बीड, (वर्ग-3) |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | 4,00,000/- (चार लाख रूपये फक्त) |
| **पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम** | दि.7/11/25 रोजीच्या पडताळणीमध्ये 3 लाखाची लाचेची मागणी करून 2.5 लाख स्वीकारण्याची तयारी दर्शविली तसेच दि.10/11/25 रोजीच्या पडताळणीमध्ये आलोसे यांनी 2.5 लाखाची मागणी करून तडजोडीअंती 2 लाख स्वीकारण्याची तयारी दर्शविली |
| **पडताळणी दिनांक** | दि. 07/11/2025, 10/11/2025 |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | 2,00,000/- (दोन लाख रूपये) |
| **सापळा दिनांक** | दि. 10/11/2025 |
| **ठिकाण** | साईराज कॅन्टीन, केडगाव चौफुला, ता.दौंड, जि. पुणे |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती आसावरी शेडगे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 8425808058) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती शैलजा शिंदे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र.) |

**थोडक्यात माहिती :-**

यातील तक्रारदार हे व्यवसायाने शेतकरी असून त्यांनी 2012 साली मौजे देलवडी, ता.दौंड येथे गट क्र. 1506 मधील 0.06 आर क्षेत्र खरेदी केलेले असून तसा महसूल दप्तरी 7/12 वर नोंदी झालेल्या आहेत. जुलै 2024 मध्ये तक्रारदार यांनी जमिनीचा संगणकीय 7/12 उतारा काढला असता त्यावर तक्रारदार यांचे नावे 0.06 आर ऐवजी 0.03 आर क्षेत्र नोंद दिसून आल्याने तक्रारदार यांनी संगणकीय 7/12 वर दुरूस्ती होणेकारिता दि. 7/8/24 रोजी आलोसे तलाठी दीपक आजबे यांचेकडे लेखी अर्ज केला होता. त्यानंतर वेळोवेळी तक्रारदार हे सातबारा उताऱ्यावरील दुरूस्ती होण्याकरीता आलोसे यांची वारंवार भेट घेत होते तेव्हा आलोसे हे तक्रारदारांना काम करून देण्याचे आश्वासन देत होते. सप्टेंबर 2025 मध्ये तक्रारदार यांच्या संगणकीय 7/12 उताऱ्यावर दुरूस्ती करण्याकरीता आलोसे यांनी तक्रारदारांकडे हस्तलिखित 7/12 उताऱ्याची प्रत मागितली तेव्हा तक्रारदार यांनी ती हस्तलिखित प्रत तहसीलदार कार्यालयातून प्राप्त करून तलाठी श्री आजबे यांना दिली त्यावेळी त्यांनी तक्रारदाराच्या संगणकीय 7/12 वर दुरूस्ती करण्यासाठी प्रस्ताव तयार करून तो प्रस्ताव तहसीलदार यांच्याकडे पाठवण्यासाठी तक्रारदाराकडे 4 लाख रूपयाची मागणी केल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी दि 6/11/25 रोजी ए.सी.बी.कार्यालय, पुणे येथे दिली होती.

तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. 7/11/2025 व दि. 10/11/25 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच मागणीबाबत पडताळणी कारवाई केली असता दि. 7/11/25 रोजीच्या पडताळणीमध्ये आलोसे यांनी तक्रारदाराच्या वरील कामासाठी तक्रारदाकडे 3 लाखाची लाचेची मागणी करून 2.5 लाख स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याचे निष्पन्न झाले तसेच दि.10/11/25 रोजी पडताळणी मध्ये आलोसे यांनी 2.5 लाखाची मागणी करून तडजोडीअंती 2 लाख स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याचे निष्पन्न झाले.

दि.10/11/2025 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील आरोपी लोकसेवक दीपक आजबे वय 37 वर्ष, तलाठी सजा-देलवाडी यांनी' साईराज कॅन्टीन' केडगाव चौफुला ता.दौंड येथे तक्रारदाराकडून 2 लाख रूपयाची लाच 17.45 वाजता स्वीकारली असता रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यांच्याविरुद्ध यवत पोलीस स्टेशन ठाणे, पुणे ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक -** 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट -** www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन ॲप तक्रार -** www.acbmaharashtra.net.in

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.